म. ग्रं. सं. ठाणें
विषय धर्म २१
सं. नं. २२५

# ब्रह्मोपासना

आणि

## प्रासंगिक प्रार्थना.

सर्व ईश्वरभक्तांकरितां रचिला

[illegible]

भा[illegible].

मुंबईत

ज्ञानमित्र छापखान्यांत छापिला.

---

सन १८८३. शके १८०५.

---

किंमत अर्धा आणा.

# ब्रह्मोपासना.

ह्या सर्व जगताचा उत्पन्नकर्ता, याचा शास्ता, आणि पालक जो सर्वसमर्थ परमात्मा त्याची प्रत्यहीं उपासना करणें हें मनुष्यमात्राचें कर्तव्य होय. परमेश्वराच्या उपासनेचीं **उद्बोधन, स्तवन, ध्यान** आणि **प्रार्थना** अशीं चार अंगें आहेत. सर्वकाळ प्रापंचिक व्यवहारांत मन गुंतलेलें असल्यामुळें तें परमेश्वराविषयीं विचार करण्यास योग्य नसतें, त्यास प्रापंचिक व्यवसायांतून काढून ईश्वरोपासनेस प्रवृत्त करणें हें **उद्बोधन.** परमेश्वराचे नित्य आणि परमावधिक असे जे गुण त्यांच्या मननाच्यायोगें उत्पन्न होणारी जी अनन्यभावेंकरून प्रीति व पूज्यबुद्धि तिचें प्रदर्शन करणें, व तो अमर्याद कारुण्य व स्नेह यांच्या योगें आमचें शरीर व आत्मा यांचें रक्षण करितो अशी आपली मति झाली असतां त्याजविषयीं सहज उत्पन्न होणारी जी कृतज्ञताबुद्धि तिचें प्रदर्शन करणें, हें **स्तवन. ध्यान** ह्मणजे सर्वव्यापकत्व, सर्वज्ञत्व, अनन्तशक्तिमत्व, परम कारुणिकत्व आणि शुद्धत्व हे जे त्याचे गुण त्यांचें मनन करून ज्ञानचक्षूंनीं त्याला साक्षात् पाहाणें. आमची वृत्ति शांत कर, आमचा आत्मा विमल राख, पापासून आह्मांस मुक्त कर असें त्याजपाशीं मागणें ह्याला **प्रार्थना** ह्मणावें.

हीं चारही अंगें यथायोग्य रीतीनें परिपूर्ण असलीं ह्मणजे परमात्म्याची वास्तविक उपासना होते.

आपली ईश्वराविषयीं पूज्यबुद्धि व खरा कृतज्ञभाव हीं अंतःकरणामध्यें जागृत होऊन त्यांच्या अन्वयें योग्य वर्तन झालें, आणि ईश्वर आपल्या सन्निध वास करीत आहे असा साक्षात् अनुभव होण्याची उत्कंठापूर्वक इच्छाही पूर्ण झाली, आणि आपला उद्धार व्हावा ही इच्छा सफल झाली, ह्मणजे ह्या प्रकारच्या आराधनेचा उद्देश सिद्धीस गेला असें समजावें. ह्या चार अंगांतून कांहीं एकाचें प्राबल्य असून इतरांचा अभाव अथवा कमतीपणा असतो असें कित्येक प्रसंगीं घडतें; उदाहरण, अकस्मात् अचिंतित असा आपणास कांहीं लाभ झाला ह्मणजे कृतज्ञताबुद्धि प्रवृत्त होते, किंवा दुःख आणि यातना प्राप्त झाल्या ह्मणजे दृढ भावानें ईश्वराचा आपण धांवा ह्मणजे प्रार्थना करितों. अशा रीतीनें प्रसंगानुसार मनोवृत्ति प्रज्वलित होणें हें स्वाभाविकच आहे, आणि तिचा निरोध केला ह्मणजे बहुधा वाईट फळ होतें. परंतु साधारण उपासना चारही अंगांनीं परिपूर्ण अशी असली पाहिजे, ह्मणजे तेणेंकरून आपल्या अंतःकरणाचे सर्व प्रकारचे भाव प्रज्वलित होऊन समाधान होतें.

Kashinath T. Telang
1095
Lee
१४-५-१९



मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०
ठाणे

# ब्रह्मोपासना.

## उद्बोधन.

### पद.

("नको हरि निशीं बाहेर जाऊं" ह्या चालीवर.)

स्तवनीं लागा परमेशाच्या । जातो काळ वायां रे ॥ध्रु०॥ सत्सुख सोडुनि उगाचि जनहो। भुलतां तुह्मी प्रपंचा रे॥ धन जन वैभव मानहि तैसा । सकळ व्यर्थ पसारा रे ॥ स्तवनीं० ॥ १ ॥ भवजलडोहीं बुडतां कां तुह्मि । कामा नये धन मान रे ॥ आपुल्या चित्तीं भाव करा दृढ । धरा त्याचिया पायां रे ॥ स्तवनीं० ॥ २ ॥ पतितपावन जोडुनि प्रेमें । भजन करा अनुवार रे ॥ दास तुमचा तुह्मां प्रार्थी । ध्यावा विश्वाधार रे ॥ स्तवनीं० ॥ ३ ॥

जो ह्या सकल विश्वाचा उत्पन्नकर्त्ता, सर्व प्राणी-मात्रांचा, वृक्षवनस्पतींचा पालनकर्ता, जो आपणा सर्वांचा मायबाप, परम वत्सल परमेश्वर, त्याचें स्तवन करण्याकरितां, त्याची आराधना करण्याकरितां, त्याज-पाशीं आपले दोष, आपलीं पातकें व आपली स्थिति निवेदन करण्याकरितां, आणि त्याची कृपा आह्मांवर असावी, त्याचें घडोघडी आह्मास साहाय्य मिळावें, आणि आह्मीं ह्या मोह सागरांतून पैलतीरीं जाऊन

सर्वकाल त्या परम पवित्र परम मंगल पित्याचे संनिध वास करण्यास योग्य व्हावें ह्मणून त्याचे चरणापाशीं आलों आहों. तो भगवान् आह्मांवर अनुग्रह करो; आमचें चित्त सर्व उपाधींपासून मुक्त होऊन त्याचे चरणीं एकाग्रतेनें लागो. सर्वत्र तोच वास करीत आहे, जिकडे पहावें तिकडे त्याचेंच दिव्य स्वरूप दिसत आहे अशी आमची वृति होवो.

**योदेवोऽग्नौ योऽप्सु यः पृथिव्यां यो विश्वं भुवनमाविवेश। य ओषधीषु यो वनस्पतिषु तस्मै देवाय नमोनमः ॥**

**अर्थ**—जो देव अग्नीच्या ठायीं, जो जलाच्या ठायीं, जो पृथ्वीच्या ठायीं, जो सर्व वृक्षवनस्पति आदिकरून संपूर्ण जगाच्या ठायीं व्यापून राहिला आहे, त्याप्रत आह्मीं वारंवार नमस्कार करितों.

**य एकोऽवर्णो बहुधा शक्तियोगाद्वर्णाननेकान्निहितार्थो दधाति। वि चैति चान्ते विश्वमादौ स देवः स नो बुद्ध्या शुभया संयुनक्तु ॥ १ ॥**

**अर्थ**—जो एक अद्वितीय, निराकार परमेश्वर ही सर्व नानाविध साकार सृष्टि सप्रयोजन निर्माण करितो, आणि आदीं ज्यापासून सृष्टि निर्माण होते व अंतींही ज्याच्या ठायीं ती लीन होते, तो देव आह्मांस शुभबुद्धि देवो.

## स्तवन.

**सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म ॥ आनन्दरूपममृतं यद्विभाति ॥ शांतंशिवमद्वैतं ॥ शुद्धमपापविद्धम्. ॥**

हे जगन्नायक परमेश्वर, हे सर्व शक्तिमान् प्रभो, तूं ह्या सकल विश्वाचा उत्पन्नकर्ता, व सर्व प्राणिमात्रांचा पालनकर्ता आहेस. आह्मी सर्व केवळ तुझ्याच कृपेच्या योगानें ह्या जगांत वास करीत आहों. तुझें सामर्थ्य अपार आहे. तुझ्या शक्तीची कल्पनाही आह्मांस करवत नाहीं. ह्या जगाकडे क्षणभर निरखून पाहिलें असतां, अति विस्तीर्ण जें आकाश त्याकडे उगीच दृष्टी फिरविली असतां, आमची मति गुंग होते. परम तेजस्वी असा सूर्य, परम शीतल आणि आनंद दायक चंद्र, तसेच सर्व आकाशभर पसरलेले असंख्य तारे, हे तुझ्या सामर्थ्याची, तुझ्या अपार चातुर्याची, साक्ष देत आहेत. तूं सर्व व्यापी आहेस. ह्या जगांत तूं नाहींस असें एकही ठिकाण नाहीं. तूं सर्वसाक्षी आहेस. ह्या जगांत जें कांहीं सर्व चाललें आहे तें तूं पहात आहेस. तुझ्या दृष्टी आड कोणी कांहीं एक करूं शकत नाहीं. आमच्या मनांतील गुप्त गोष्टीही तूं जाणूं शकतोस. तूं परम पवित्र आहेस. पाप, असत्य, अमंगलता, हीं तुला क्षणमात्रही सहन होणार नाहींत.

आह्मी सदा पवित्र असावें, पापाचा आह्मांस स्पर्शही सहन होऊं नये, अशी बुद्धि त्वां आह्मास दिली आहेस. हे जगदीश्वर, तूं परम कृपाळू आहेस, परम प्रेम तुझ्या ठिकाणीं आहे. तूं आह्मा सर्वांचा परम ममताळू पिता, आमचें सर्वकाळ पालन करीत आहेस. आह्मांस सर्व दुःखांतून, सर्व संकटांतून तूंच पार पाडितोस. आह्मी जेव्हां कांहीं संकटांत पडतों, आह्मांस कांहीं सुचेनासें होतें, त्या वेळेस तूंच आमच्या साहाय्यास येऊन आह्मांस सोडवितोस आणि आमच्या अंतःकरणास संतोषवितोस. असा जो तूं दीनदयाळ, जगन्नायक, सर्व शक्तिमान्, सर्वव्यापी, सर्वसाक्षी, परम पवित्र, परम कृपाळू परमेश्वर, त्या तुझ्या चरणीं आह्मी तुझे दीन दास परम नम्रतेनें, सप्रेमभावानें प्रणिपात करितों. भगवन् तूं आह्मांस आपल्या पदरीं घे.

**तत्सवितुर्वरेण्यं भर्गोदेवस्य धीमहि धियोयोनः प्रचोदयात्**

अर्थ– अखिल जगत् निर्माणकर्त्या प्रभूच्या परम मंगलमय स्वरूपाचें मी ध्यान करितों. तो मला सुमति प्रेरण करो.

(एथें कांहीं वेळ मौन धारण करून परमेश्वराच्या स्वरूपाचें ध्यान करावें.)

संध्या

## प्रार्थना.

हे दयाघन परमेश्वर, आह्मीं सर्वकाळ ह्या संसारसुखाच्या प्राप्त्यर्थ अनेक यत्नांत निमग्न झालों आहों. ह्या सुखांची प्राप्ति हेंच ह्या जन्माचें सार्थक असें आह्मांस वाटत आहे. आणि ह्या सर्व सुखांचा दाता, सर्व दुःखांचा निवारिता-जो तूं त्यास सर्वस्वीं विसरत आहों; तर अशा ह्या परम खेदकारक स्थितींतून आह्मांस काढ; ह्या क्षणिक सुखांच्या मोहांतून आह्मांस सोडीव; तुझ्या भक्तीची अभिरुचि आह्मांमध्यें उत्पन्न कर; आणि सर्वकाळ तुझ्या आज्ञेप्रमाणें वर्तण्याचें आह्मांस सामर्थ्य दे; हेंच दयामय जगदीश्वर, तुझ्या चरणापाशीं ह्या दीन दासांचें मागणें आहे. भगवन् आमचा एवढा मनोरथ पूर्ण कर.

**अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम ।**
**तस्मात्कारुण्यभावेन रक्ष मां परमेश्वर ॥ १ ॥**

**अर्थ**—हे परमेश्वर, मला ह्या भवसागरांत तुजवांचून अन्य कोणी त्राता नाहीं; तूंच माझा एक आश्रयदाता आहेस; यास्तव कारुण्यभावानें माझें सदा रक्षण कर.

**अपराधसहस्राणि क्रियन्तेऽहर्निशं मया ।**
**दासोऽहमिति मां मत्वा क्षम्यतां परमेश्वर ॥ १ ॥**

**अर्थ**—हे परमेश्वरा, मजकडून सहस्रावधि अपराध घडतात; परंतु मी तुझा दीन सेवक आहें, माझ्या दुर्बलतेकडे पाहून मला क्षमा कर.

**मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं परेश्वर ।**
**यत्पूजितं मया देव परिपूर्णं तदस्तु मे ॥ १ ॥**

**अर्थ**—हे परमेश्वरा, मी ज्ञानशून्य. तुझें स्तवन कसें करावें हें मला समजत नाहीं. तुझें प्रिय कार्य मजकडून सतत घडत नाहीं. सप्रेमभक्ति माझ्या अंतःकरणांत दृढ होत नाहीं. तथापि मी यथामति जी तुझी उपासना केली ती तुला ग्राह्य होवो. **ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥**

## पद.

तारीं तारीं दीननाथा । गेला गेला जन्म वृथा ॥ धृ० ॥ दृश्यसंगीं गुंग झालों । क्षणिकसुखें नाहिं धालों । वैराग्याच्या वाटे भ्यालों । वारीं वारीं मोहव्यथा ॥ तारीं० ॥ १ ॥ नाहीं केली शुद्ध मति । कैशी घडे तव भक्ति । मार्ग चुकलों झाली भ्रांती । धरुनि हातीं नेईं पंथा ॥ तारीं० ॥ २ ॥ आतां मजला अन्य त्राता । न दिसे तुजविणें अनंता । धांव वेगें कृपावंता । रंक पायीं ठेवी माथा ॥ तारीं० ॥ ३ ॥

( धर्मोपदेश व विशेष प्रार्थना. )

## अभंग.

सर्वभावें आलों तुजची शरण । कायावाचामनासंहित देवा ॥ १ ॥ आणीक दुसरें नयें माझ्या मना । राहिली वासना तुझ्या पायीं ॥ २ ॥ माझिये वरीचें कांहीं जड भारी । तुजवीण वारी कोण देवा ॥ ३ ॥ तुझे आह्मी दास आमुचा तूं धनी । चालत दुरुनी आलों मार्गे ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां घेतलें धरणें । हिशेवाकारणें भेटी देई ॥ ५ ॥

## आरती.

जयदेव जयदेव जय मंगलधामा । दर्शन दीना दासां दे हृदयारामा ॥ धृ० ॥ शोभे सुंदर तव कृति आनंदवि नयना । घ्राणा सुवास सुस्वर तोषविती काना ॥ तुझिये स्वादुरसांची घेई रुचि रसना । दुर्बल इंद्रियगण परि वर्तविशी त्यांनां ॥ जय० ॥ १ ॥ त्यागुनि सर्वहि ऋषिमुनि तव ध्यानीं रतले। तेही पूर्णपणें नच तुज जाणूं शकले ॥ ऐशा अतींद्रियातें संसारीं गढले । विषयी हे जन अबुद्ध आकळितां श्रमले ॥ जय० ॥ २ ॥ परि भेटीची तुझिये इच्छा बहु जाहली । हीं दीनांची आस पूर्ण किजे वहिली ॥ ज्ञाताज्ञातअतिक्रम तूं पोटीं घालीं । देई दर्शन बापा हृदयें तान्हेलीं ॥ जय० ॥ ३ ॥

# निरनिराळ्या प्रसंगीं करावयाच्या प्रार्थना.

## प्रातःकालची प्रार्थना.

श्लोक.

लोकेश चैतन्यमयाधिदेव मांगल्य विष्णो भवदाज्ञयैव॥
हिताय लोकस्य तव प्रियार्थं संसारयात्रामनुवर्तयिष्ये॥

अर्थ– हे जगदीश्वर, हे चैतन्यमय परमेश्वर, मंगलमय, सर्वव्यापक प्रभो, तुझ्याच आज्ञेनें लोकहितार्थ आणि तव प्रीत्यर्थ मी आतां प्रपंचकृत्यास प्रवृत्त होतों.

हे जीवनदात्या प्रभो, तुझ्या परम कृपेनें रात्रीच्या, सुखदायक निद्रेंतून मी जागृत झालों आहें; आणि आतां दिवसाचे व्यवसाय करण्यास प्रवृत्त होणार; तेव्हां अशा समयीं तुजसमोर येऊन तुझें दर्शन घ्यावें आणि तुझी प्रार्थना करावी हें मला अवश्य आहे. मी अयोग्य वर्तन करून, पाप संचित करावें, अशी तुझी इच्छा नाहीं; परंतु पुण्याचरण करून पापनिवृत्त होत्साता, ज्या गोष्टींनीं माझ्या ऐहिक व पारमार्थिक सुखाची वृद्धि होईल, त्याच गोष्टी मी आचराव्या असा तुझा हेतु आहे. तर हे सर्वसमर्थ परमेश्वर, तुझ्या प्रबल शक्तीनें ह्या दिवशीं मी कोणत्याही पापांत अथवा संकटांत पडणार नाहीं, असें तूं कर. ज्या माझ्या कृत्यांनीं तुला संतोष होईल, तींच कर-

सं-ध-२५ ११

ण्याची मला आज बुद्धि होऊं दे, ही तुझेजवळ माझी अनन्यभावें प्रार्थना आहे.

## भोजनकालची प्रार्थना.

हे सर्वदात्या परमेश्वरा, तूं कृपाळू होऊन दिलेलें हें अन्नोदक पवित्र कर, आणि ह्यांचें भक्षण करून उन्मत्त न होतां तुझ्या सेवेंत तत्पर राहूं व गरिबांस यथाशक्ति साह्य करण्यास उत्सुक होऊं असें कर, हीच आह्मां दीनांची तुजजवळ विनवणी आहे.

## प्रार्थना २.

हे दयाळू पित्या! आमच्या शरीरपोषणार्थ ही जी खाण्याचा सामग्री तूं आह्मांस कृपेनें दिली आहेस, तिजकरितां कृतज्ञ मनानें तुझ्या चरणीं आह्मीं प्रणाम करितों.

## शयनकालची प्रार्थना.

हे करुणामय प्रभो, हा संसार तुझ्या सान्निध्यापासून मला दूर करितो. त्यामुळें माझ्या हातून होऊं नयेत अशीं कृत्यें होतात, आणि जीं उचित कर्में तीं होत नाहींत. प्रभो, आजच्या दिवशीं मजकडून पुष्कळ अन्यथा गोष्टी घडून आल्या. त्या सर्वांची क्षमा करून पुनरपि माझ्या हातून अशीं कृत्यें न होतील असें कर. आजची निद्रा हीच माझी शेवटली निद्रा व्हावी अशी

जर तुझी इच्छा असली, तर तसें होऊं दे; आणि इहलोकीं ज्याप्रमाणें निद्रेंतून जागृत झाल्यावर तुझ्या कृपेनें मला उत्साह व आनंद होतो, तद्वतच, हे मायबाप, परलोकीं मला होवो. आज रात्रीं येणाऱ्या सर्व संकटांपासून मला दूर राख. तूं दयामय प्रभु आहेस, ह्मणूनच मी अशी तुझी प्रार्थना करितों. शेवटीं हा स्वप्राण तुझ्या चरणीं स्थिर करून तुझा निरोप घेतों.

## संकटावस्थेंतील प्रार्थना.

हे जगदात्मन्, दयामय, मायबाप, या अंतःकरणाची दुर्बलता परम मोठी आहे. तिजविषयीं विचार करितों तेव्हां मजला अत्यंत क्लेश होतो. यत्किंचित् प्रपंचामध्यें संकट उपस्थित झालें असतां, दुःख प्राप्त झालें असतां, अंतःकरण धैर्य सोडून, विवेक सोडून विव्हळ होतें. त्या गोष्टीची माझी मजलाच लज्जा वाटते. तुजविषयीं अंतःकरणामध्यें श्रद्धा दृढ नाहीं. ती जर दृढ असती तर अशा प्रकारें ह्या संकटास मी भ्यालों नसतों व दुःखानें विव्हळ झालों नसतों. ब्रह्मांडाचा नायक, सर्वांवर राज्य करणारा जो तूं माझा मायबाप, वत्सल मायबाप, ही गोष्ट स्पष्टपणें जर अंतःकरणांत सतत वागती, तर सर्व प्रकारची भीति नाहींशी झाली असती, संकट हें किमपि संकटसें वाटलें नसतें, आणि दुःखाच्या प्रसंगीं